# scienc e x p r e s s
## Biodiversity Special

www.sciencexpress.in

22 ऑगस्ट २०१३

प्रति,

......................................,

**विषय : सायन्स एक्स्प्रेस - जैवविविधता विशेष प्रदर्शनी ट्रेन**

माननीय शिक्षक/शिक्षिका,

"सायन्स एक्स्प्रेस - जैवविविधता विशेष" भारत सरकारच्या, विज्ञान व तंत्रज्ञान विभाग आणि वन व पर्यावरण मंत्रालय यांचा संयुक्त उपक्रम, विक्रम ए.साराभाई कम्युनिटी सायन्स सेंटर (VASCSC) राबवत आहे. सायन्स एक्स्प्रेस हि १६ डब्यांची अशी एक ट्रेन आहे जी देशातील जैवविविधता आणि त्यांचा होणारा ह्रास यांची माहिती लोकांना करून देणे आणि त्याचप्रमाणे तिच्या संवर्धनासाठी जागरूकतेचा संदेश जनतेपर्यंत पोहचवण्याचे काम करत आहे.

ऑक्टोबर २००७ पासून सायन्स एक्स्प्रेस ह्या प्रदर्शनी ट्रेनने आतापर्यंत ९८ हजार किमी पेक्षा जास्त अंतर कापले आहे. ११४० दिवसांच्या या संपूर्ण प्रवासातील ३२० थांब्यांमध्ये १ कोटी लोकांनी या ट्रेनला भेट दिली असून, सायन्स एक्स्प्रेस हि देशातील सर्वात मोठी, लांब व जास्तीत जास्त लोकांनी बघितलेली विज्ञान प्रदर्शनी आहे. ट्रेनची सध्याची २०१३ आवृत्ती ९ एप्रिल ते २८ ऑक्टोबर २०१३ दरम्यान ६२ स्थानकांवर थांबे घेत आहे. या अभूतपूर्व प्रदर्शनीचा उदेष्य भारतातील जैवविविधता, वातावरण बदल आणि तत्सम गंभीर प्रश्नाविषयी मुखत्वेकरून विद्यार्थी, शिक्षक आणि अभिगन्त्यांपर्यंत पसरवण्याचे काम करत आहे. सायन्स एक्स्प्रेस जैवविविधता विशेष (SEBS) २०१३ या प्रदर्शनीचे पुढच्या काही स्टेशनचे वेळापत्रक खालील प्रमाणे होय -

| | | |
|---|---|---|
| मिरज | : | ०६ - ०९ सप्टेम्बर |
| मालटेकडी | : | ११ - १४ सप्टेम्बर |
| औरंगाबाद | : | १५ - १८ सप्टेम्बर |

आम्ही सगळ्यांना आमंत्रित करतो, मुखत्वे शिक्षक आणि विद्यार्थी यांनी प्रदर्शनीचा लाभ घ्यावा. प्रदर्शन विनामूल्य दाखविण्यात येत आहे. अधिक माहिती करिता www.sciencexpress.in ला भेट द्या.

प्रदर्शनाला भेट देण्याकरिता अथवा अधिक माहिती साठी sciencexpress@gmail.com वर Email करा किंवा ट्रेन वर ०९४२८४०५४०७ / ०९४२८४०५४०८ या क्रमांकांवर संपर्क साधावा. संबंधित शिक्षकांनी "शिक्षण विषयक मार्गदर्शन" कार्यशाळेत भाग घेण्याकरिता, अगोदर संपर्क साधावा. आपल्या माहितीकरिता प्रदर्शनाचे वेळापत्रक व पोस्टर यासोबतच जोडले आहे.

या प्रतिष्ठित, अनोख्या प्रदर्शनाला अधिकाधिक लोकांपर्यंत पोहाचवण्यासाठी सहकार्य करावे, जेणेकरून अधिकाधिक लोकं याचा लाभ घेऊ शकतील.

आपला विश्वासू

दिलीप सुरकर
निर्देशक

**Vikram A Sarabhai Community Science Centre**
Opp. Gujarat University, Navrangpura, Ahmedabad - 380 009, India
Tel: +91 79 26302914, 26302085 Fax: +91 79 26306497 Email: vascsc@gmail.com Web: www.vascsc.org